राज्यातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या समवेत आयोजित करावयाच्या व्हिडीओ कॉन्फरन्स (V.C.) व व्यक्तिशः बैठकांच्या अनुषंगाने सूचना देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : GAD-७००११/९/२०२५-GAD-Lokshahi Din
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
दि. ११ मे, २०२६

**वाचा:** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: GAD-७००११/९/२०२५-GAD-Lokshahi Din, दिनांक १० डिसेंबर, २०२५.

**प्रस्तावना:**

राज्यातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या समवेत आयोजित करावयाच्या व्हिडीओ कॉन्फरन्स (V.C.) व व्यक्तिशः बैठकांच्या अनुषंगाने सूचना देण्याबाबत वाचा येथील शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर शासन परिपत्रकामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शुध्दीपत्रक:**

दि.१० डिसेंबर,२०२५ च्या शासन परिपत्रकामध्ये खालील तक्त्यातील रकाना नं. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | दिनांक १० डिसेंबर, २०२५ च्या शासन परिपत्रकातील मुद्दे क्रमांक | दिनांक १० डिसेंबर,२०२५ च्या शासन परिपत्रकामध्ये सुधारणा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | २) सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्याशी संबंधित विषयांबाबत चर्चा करणे, आढावा घेणे यासंदर्भात प्रत्येक आठवड्याच्या **सोमवार व गुरुवारी** व्हि. सी. द्वारे एकत्रित बैठकांचे आयोजन करावे. सदर दिवशी सुट्टी असल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव बैठक होणार नसेल तर सदर बैठक पुढील कामकाजाच्या दिवशी आयोजित करण्यात यावी | २) सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांच्यासोबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दर बुधवारी सकाळी ११:०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हि. सी.) द्वारे बैठकीचे आयोजन करण्यात यावे. सदर दिवशी सुट्टी असल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव बैठक होणार नसेल तर सदर बैठक पुढील कामकाजाच्या दिवशी आयोजित करण्यात यावी. |
| २ | ६) विविध प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे प्रशासकीय | ६) विविध प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे प्रशासकीय |

| | | |
|---|---|---|
| | विभागनिहाय व्हि.सी. वेळापत्रक अगोदरच्या सोमवारपर्यंत तयार करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागातील लोकशाही दिन कक्ष यांचेमार्फत करण्यात येईल. त्यासाठी, सर्व विभागांकडून प्राप्त होणाऱ्या विनंतीनुसार बैठकांचे आयोजन करण्यात यावे. | विभागनिहाय व्हि.सी. वेळापत्रक अगोदरच्या बुधवार पर्यंत तयार करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागातील लोकशाही दिन कक्ष यांचेमार्फत करण्यात येईल. त्यासाठी, सर्व विभागांकडून प्राप्त होणाऱ्या विनंतीनुसार बैठकांचे आयोजन करण्यात यावे. तसेच सदर बैठकीकरता आवश्यक समन्वय सामान्य प्रशासन विभाग (लोकशाही दिन कक्ष) यांचे मार्फत करण्यात येईल. |
| ३ | १२) विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यासाठी **सोमवार व मंगळवार** हा मुख्यालयाचा दिवस ठरवून देण्यात येत आहे. | १२) विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यासाठी **सोमवार व मंगळवार** हा मुख्यालयाचा दिवस ठरवून देण्यात येत आहे. तसेच सर्व जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांनी आपल्या जिल्हयात दरमहा किमान चार दिवस क्षेत्रीय भेटीच्या अनुषंगाने जिल्हा मुख्यालयाबाहेर मुक्काम करणे अपेक्षित राहील. |

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in येथे उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०५१११६४३४०७००७ असा आहे. हा शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIVEK VAMAN JAGADALE

Digitally signed by VIVEK VAMAN JAGADALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=7D00E9EBB180EE84F4D43100AC2EFF6683F136C1EF2C2A29DFEFE3F684583E6F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EABD1BBDEA4937DB9B785FC59EC8B7687F88149B7CC66D8B9FEC89433407C3B0, cn=VIVEK VAMAN JAGADALE
Date: 2026.05.11 17:11:15 +05'30'

**( विवेक जगदाळे )**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
२. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई
३. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.मुख्य सचिव यांचे सह-सचिव,मंत्रालय,मुंबई
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
८. निवड नस्ती,लोकशाही दिन कक्ष,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.